**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८९/२०१९** | **दिनांक ०५/११/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ३०/१०/२०१९ ते ०५/११/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०६/११/२०१९ सकाळी ८:३० पासून १०/११/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०/१० | ३१/१० | ०१/११ | ०२/११ | ०३/११ | ०४/११ | ०५/११ | | ०६/११ | ०७/११ | ०८/११ | ०९/११ | १०/११ |
| ०.० | ०.० | ०.० | २०.० | ०.० | ०.० | - | पाऊस (मिमी) | ० | ३ | ११ | २ | ० |
| ३४.० | ३५.४ | ३५.० | ३४.८ | ३३.० | ३२.४ | - | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३३ | ३१ | ३१ | ३२ |
| २४.० | २४.० | २७.० | २३.६ | २४.२ | २३.० | - | किमान तापमान (अं.से) | २५ | २४ | २३ | २३ | २३ |
| ० | ० | २ | ० | ० | ० | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ३ | २ | २ | ० | ० |
| ८८ | ७४ | ७९ | ८४ | ८० | ८१ | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७९ | ८२ | ८३ | ७९ | ७० |
| ५२ | ४७ | ५४ | ५७ | ५८ | ६८ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ६१ | ६३ | ७१ | ६३ | ५५ |
| ३.४ | २.० | १.९ | १.९ | २.१ | १.८ | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८.९ | १७.२ | १६.४ | ९.१ | ११.५ |
| नै. | नै. | शांत | नै. | शांत | शांत | - | वाऱ्याची दिशा | नै.द. | द. | आ.पू. | ई.ऊ. | इ. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| २०.० | ४१९२.२ | २३५९.६ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ८ नोव्हेंबर, २०१९ रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ संभवते.**

**“महा” चक्रीवादळाच्या प्रभावामुळे पालघर आणि ठाणे किनारपट्टी भागात वाऱ्याचा वेग ताशी ५० ते ६० कि.मी. राहण्याची शक्यता आहे.**

**दिनांक ८ ते १४ नोव्हेंबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा कमी राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार पालघर जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा आणि प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार मध्यम ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **इशारा** | -- | • भारतीय मौसम विज्ञान विभागाने प्रसारित केलेल्या पुर्वानुमानानुसार “महा” चक्रीवादळामुळे पालघर जिल्ह्यामध्ये दिनांक ६ नोव्हेंबर २०१९ रोजी बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पर्जन्यवृष्टीची आणि तुरळक ठिकाणी जोरदार पर्जन्यवृष्टीची शक्यता असून पालघर आणि ठाणे किनारपट्टी भागात वाऱ्याचा वेग ताशी ५० ते ६० कि.मी. राहण्याची शक्यता आहे. |
| **भात** | **पक्व अवस्था** | • दिनांक ६ नोव्हेंबर २०१९ रोजी बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पर्जन्यवृष्टीची शक्यता असल्याने भात पिकाची कापणी २ ते ३ दिवस पुढे ढकलावी तसेच कापणी केलेले भात सुरक्षित ठिकाणी साठविण्याची व्यवस्था करावी.<br>• वादळाची तीव्रता कमी झाल्यानंतर पाऊसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या भात पिकाची सकाळच्या वेळेस जमिनीलगत कापणी व मळणी करून भात सुरक्षित ठिकाणी सुकण्यासाठी पसरून ठेवावे. |
| **नागली** | **पक्व अवस्था** | • दिनांक ६ नोव्हेंबर २०१९ रोजी बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पर्जन्यवृष्टीची शक्यता असल्याने.नागली पिकाची कापणी २ ते ३ दिवस पुढे ढकलावी तसेच कापणी केलेले कणसे सुरक्षित ठिकाणी साठविण्याची व्यवस्था करावी.<br>• वादळाची तीव्रता कमी झाल्यानंतर पाऊसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या नागली पिकाची सकाळच्या वेळेस कणसे विळ्याने कापून उन्हात वाळवून मळणी करून साठवणूक करावी. |
| **भाजीपाला रोपवाटिका** | -- | • नवीन लागवड केलेल्या फळपिकांना तसेच भाजीपाला रोपांना काठीचा आधार द्यावा. सर्वप्रकारच्या फळबागा तसेच भाजीपाला लागवडीमधील पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**